केंद्र पुरस्कृत योजना सन २०२६-२७

"व्याघ्र व हत्ती प्रकल्प" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत कोल्हापूर वन वृत्तातील वन्यहत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७.२६/प्र. क्र. २७३/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १३.०८.२०२६.

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ४-१ (५८)/२०२४-पीटी व इ., (Computer No-२३९०२६), दिनांक ०३.०७.२०२६.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/सी/यो/प्र.क्र. ०५/११४/२०२६-२७, दिनांक २४.०७.२०२६.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ मध्ये केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये "व्याघ्र व हत्ती प्रकल्प" या योजनेअंतर्गत कोल्हापूर वन वृत्तातील वन्यहत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांकरीता सर्वसाधारण घटक व अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत रु. ८५.०० लक्ष रक्कमेचा वार्षिक प्रर्वतन अहवाल मंजूर केला असून रु. २५.५० चा प्रथम हप्ता मंजूर केला आहे. त्या अनुरुप सर्वसाधारण घटक व अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत राज्य हिस्सा रु. १७.०० लक्ष वितरीत करणे अपेक्षित आहे.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये "व्याघ्र व हत्ती प्रकल्प" या योजनेअंतर्गत कोल्हापूर वन वृत्तातील वन्यहत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांकरीता **सर्वसाधारण घटकांतर्गत रु. ४२.५० लक्ष** निधी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या कार्यबाबींवर खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

अ) हत्ती प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत कोल्हापूर वन वृत्तातील वन्यहत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांकरीता होणारा खर्च I) केंद्र हिस्सा ६०%

अंतर्गत आवर्ती + अनावर्ती बाबींसाठी रु. २५.५० लक्ष लेखाशिर्ष क्रमांक :- २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(१४) हत्ती प्रकल्प (६० % केंद्रीय अनुदान) (२४०६ २३५७) II) त्या अनुरुप राज्य शासनाचा राज्य हिस्सा ४० % करीता रु. १७.०० लक्ष लेखाशिर्ष कमांक :- २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००)(२२) हत्ती प्रकल्प (४० % राज्य हिस्सा) (२४०६ ए१११) च्या सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

आ) सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलवार कार्यबाबींवर व सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

इ) वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेत विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

ई) प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची जबाबदारी संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

उ) वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग परिपत्रक, क्रमांक : अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग परिपत्रक, क्रमांक : अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे असे नमूद करणे अपेक्षित होते.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१३१५०६२०६३४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.08.13 15:08:39 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर.
६. कोषागार अधिकारी, नागपूर.
७. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

****